# नंदिनीबाई गर्ल्स स्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती सत्र

By EditorialDesk - July 24, 2025




**जळगाव-लाईव्ह ट्रेंड्स न्यूज प्रतिनिधी ।** विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करून सुरक्षित डिजिटल जीवनशैलीचा संदेश देण्याच्या उद्देशाने नंदिनीबाई गर्ल्स स्कूल येथे सायबर सुरक्षा जनजागृती विषयावरील विशेष मार्गदर्शन व चर्चा सत्र उत्साहात पार पडले. इयत्ता ८ वी ते १० वीच्या सुमारे २५० विद्यार्थिनींनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेत सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी आवश्यक माहिती जाणून घेतली.

दि. २२ जुलै रोजी दुपारी ३ ते ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या विशेष सत्रामध्ये सायबर सुरक्षा तज्ज्ञ प्रियदर्शनी भांडारकर आणि खुशबू लांबोळे यांनी विद्यार्थिनींना आधुनिक डिजिटल युगातील विविध सायबर धोक्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. वाढत्या ऑनलाइन व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर इंटरनेटचा सुरक्षित वापर कसा करावा, याबाबत त्यांनी विविध उदाहरणासह माहिती दिली.




मार्गदर्शनादरम्यान ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, विशिंग, स्मिशिंग, ओटीपी आणि पासवर्डची सुरक्षितता, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, द्विस्तरीय प्रमाणीकरण (2-Factor Authentication), सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, बनावट लिंक आणि क्यूआर कोड स्कॅम ओळखण्याचे उपाय, सायबर बुलिंग, डिजिटल गोपनीयता, अज्ञात व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क टाळणे तसेच मोबाईल ॲप्स डाउनलोड करताना घ्यावयाची सुरक्षा काळजी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व आणि डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करण्याबाबत विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. दैनंदिन जीवनातील उदाहरणांच्या माध्यमातून सायबर हल्ल्यांचे प्रकार आणि त्यापासून बचावाचे उपाय समजावून सांगितल्याने विद्यार्थिनींना विषय अधिक प्रभावीपणे समजला.

संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या चर्चासत्रात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारले. उपस्थित शंकांचे समाधान करत सुरक्षित डिजिटल जीवनशैली अंगीकारण्याचा संकल्प विद्यार्थिनींनी यावेळी केला. सत्रामुळे विद्यार्थिनींमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी नंदिनीबाई गर्ल्स स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. एस. एम. राणे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.